करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...

परखड अग्रलेख | वस्तुनिष्ठ बातम्या
विविध सदरे | करमाळेकरांची खास ओळख

साप्ताहिक कमलाभवानी

# संदेश

वर्ष 31 वे

|www.saptahiksandesh.com | kamalabhavanisandesh@gmail.com|

संस्थापक संपादक : डॉ.ॲड.बाबूराव हिरडे
संपादक : सौ.उषादेवी बाबूराव हिरडे,
वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर
मो.९४२३३३७४८०

आपल्या व्यवसायाची ऑनलाईन जाहिरात करण्यासाठी उपयुक्त ठिकाण
साप्ताहिक संदेश ऑनलाईन न्यूज पोर्टल
संपर्क 9822058106

नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३३ वे | अंक क्र.१४६ | पाने-१२ | दि.०६/१०/२०२३ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत ४ रू.

॥ श्री कोटलिंग प्रसन्न ॥
स्थलांतर.. स्थलांतर..
शिवम स्टिल ॲन्ड सिमेंट एजन्सी
मजबुती आणि विश्वास एकाच ठिकाणी..!
टी.एम.टी.बार चे अधिकृत विक्रेते
खडी, क्रॅशसॅण्ड योग्य दरात मिळेल
प्रोप्रा : अमोल बबन टवळे
(9850125561, 9423339966)
पत्ता : नगर-सोलापूर बायपास रोड, निलज चौक, संत निरंकारी मंडळ, शेजारी, करमाळा.
आयकॉन स्टीलचे अधिकृत विक्रेते

# जेऊर सह १६ ग्रामपंचायतीच्या निवडणूका जाहीर

## ५ नोव्हेंबरला मतदान - ६ नोव्हेंबर मतमोजणी

करमाळा : करमाळा तालुक्यातील १६ ग्रामपंचायती व तीन ग्रामपंचायतीची पोटनिवडणूकीचा कार्यक्रम जाहीर झाला असून ५ नोव्हेंबरला मतदान होणार आहे. तर ६ नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे. या टप्प्यात जेऊर, केम, वीट, चिखलठाण, घोटी, कोर्टी, कंदर या मोठ्या ग्रामपंचायतीचा समावेश आहे.

करमाळा तालुक्यातील १६ ग्रामपंचायतीची मुदत जानेवारी २०२३, फेब्रुवारी २०२३ व एप्रिल २०२३ मध्ये संपली आहे. तेव्हापासून या ग्रामपंचायतीवर प्रशासक

**निवडणूक कार्यक्रम...**




- **निवडणुकीची नोटीस प्रसिध्द :** दि.६/१०/२०२३
- **अर्ज दाखल करणे :** दि.१६/१० ते २०/१०/२०२३
- **छाननी :** दि.२३/१०/२०२३ (सकाळी ११ पासून संपेपर्यंत)
- **उमेदवारी अर्ज मागे घेणे :** दि.२५/१०/२०२३ (दुपारी ३ पर्यंत)
- **निवडणूक चिन्ह व यादी प्रसिध्द करणे :** दि.२५/१०/२०२३ (दुपारी ३ नंतर)
- **मतदान :** दि.५/११/२०२३ (स.७.३० ते ५.३०) • **मतमोजणी :** दि.६/११/२०२३

आहे. भगतवाडी, जेऊर, राजुरी, चिखलठाण, गौंडरे, उंदरगाव, कंदर, कोर्टी, निंभोरे, केत्तूर, वीट, रामवाडी, घोटी, रावगाव, कावळवाडी व केम ग्रामपंचायतीची निवडणूक होणार आहे. तर तरटगाव, रिटेवाडी व मांजरगाव येथे पोटनिवडणूक होणार आहे. थेट जनतेतून सरपंच पदाची निवड होणार असल्याने सर्वच ठिकाणी तुल्यबळ लढती होणार आहेत. पोटनिवडणूक पारंपारीक पध्दतीने तर मुदत संपलेल्या १६ ग्रामपंचायतीची निवडणूक संगणक प्रणालीद्वारे होणार आहे.

जेऊर येथील ग्रामपंचायतीकडे पूर्ण तालुकावासियांचे लक्ष लागून राहिले आहे. माजी आमदार नारायण पाटील यांचे या ग्रामपंचायतीवर अनेक वर्षापासून वर्चस्व आहे. या ठिकाणी आमदार संजयमामा (पान ४ वर)



आरोग्याशिवाय जगणं सुखकारक असूच शकत नाही...!

## संपादकीय........................................!

# रूग्णालय की करूग्णालय !

राज्यातील नांदेड, छत्रपती संभाजीनगर येथे बालकांच्या मृत्यूचे सत्र सुरू आहे. तीन डजन पेक्षा जास्त मृत्यूचा आकडा गेल्यावर राज्य सरकार आणि सर्व सामान्य नागरीक हादरला आहे. प्रत्येक शहरातील रूग्णालयाची चर्चा सुरू झाली असून रूग्णालयाच्या बाबतीत करमाळा हा तर मागासलेला तालुका आहे.

मनुष्याचे आर्युमान वाढलेले आहे, पण अनेक माणसं कमी वयात मरत आहेत हे ही सत्य आहे. कोरोना सारख्या आजाराने आर्युमान वाढूनही त्याचा उपयोग झाला असे वाटत नाही. पुर्वी सुविधा नव्हत्या. प्लेग सारख्या साथीत किंवा अन्य साथीत माणसं ढिगाने मरत होते. अलीकडे सुविधा वाढल्या आणि मनुष्याचे जीवन खुपच नाजुक होत चालले आहे. साधनं आणि सुविधा वाढल्या आणि त्यात माणूस पंगु बनला आहे. श्रम कमी झाले त्याचा परिणाम आरोग्यावर होऊ लागला आहे. प्रत्येक घरा-घरात बाल्यावस्थेपासून रूग्ण निर्माण होऊ लागले आहेत. पुर्वी ५०-६० वर्षाचा माणूस मरण पावला तर सर्व गाव हळ-हळ करायचे , अलीकडे २५-३० वर्षातील युवक चालता-बोलता मरत आहेत. हे गांभिर्याने घेतले जातेच असे वाटत नाही. ७/८ वर्षाच्या मुलाला मधुमेह, १०-१२ वर्षाच्या किशोर मुलाला रक्तदाब, १८-२० वर्षाचा युवकाला हृदयरोग असे चित्र दिसू लागले आहे. हा प्रकार केवळ शहरातच नाहीतर ग्रामीण भागातही वाढत चालला आहे. प्राथमिक शाळेतील पहिली ते चौथी व माध्यमिक शाळेतील पाचवी ते दहावी पर्यंतच्या मुलांची शासनामार्फत दरवर्षी मोफत आरोग्य तपासणी होते. या तपासणीमध्ये जवळपास १० टक्के मुले गंभीर अजाराने त्रस्त असल्याचे निष्पन्न झाले आहे.याची कारणे म्हणजे विषारी अन्नधान्य. रासायनिक खतापासून निर्माण केलेले अन्न आणि जर्सी गायीचे दुध हे यातक पदार्थ आहेत.

ज्या घरात रूग्ण आहे ते घर त्रस्त असते.त्या घरात दवाखान्याचा खर्च, त्यासाठी द्यावा लागणारा वेळ आणि नेमके काय होणार याची चिंता. यामुळे गावा-गावातील लोक चिंताग्रस्त आहे. करमाळा शहर व तालुक्यातील आजारी परिवार त्रस्त असण्याचे कारण म्हणजे या तालुक्यात सर्व सुविधा असलेले अद्ययावत एकही रूग्णालय नाही. आमदार संजयमामा शिंदे यांनी तालुक्यातील रूग्णाच्या सुविधेसाठी शासन दरबारी प्रयत्न केले तसेच माजी आमदार नारायण आबा पाटील यांनीही प्रयत्न केले. त्यामुळे उपजिल्हा रूग्णालयासाठी यंत्रसामुग्री, इमारती, कर्मचारी व ५० खाटावरून ते १०० खाटापर्यंत प्रवास उपजिल्हा रूग्णालयाचा झालेला आहे एवढेच. अलीकडे करमाळा शहरात सीटीस्कॅन व तत्सम यंत्रसामुग्री आलेल्या आहेत पण एम.आर.आय.ची सुविधा येथे नाही. तालुक्यात सर्व प्रकारच्या सुविधा अद्याप एका छत्राखाली आलेल्या नाहीत. सध्या जे डॉक्टर आहेत ते त्यांच्या त्यांच्या क्षेत्रात परिपुर्ण आहेत, याबाबत दुमत नाही. पण एकाच छत्राखाली र्व प्रकारच्या सुविधा असलेले व अद्ययावत यंत्रसामुग्री असलेले एकही रूग्णालय नाही, ही येथील मोठी खंत आहे. एकाच रूग्णाला वेगवेगळे आजार असतात, अशावेळी त्या रूग्णाची पंचायत होते. असा रूग्ण ज्या डॉक्टरकडे जातो, त्यावेळी संबंधित डॉक्टर ज्यामध्ये तज्ञ आहेत त्यावर ते परिपुर्ण उपचार करतील पण अन्य आजारावर काय..? शरीरावर उपचार करणारा डॉक्टर हृदय रूग्णावर कसा उपचार करणार..? हृदयावर उपचार करणारे डॉक्टर मेंदूवर कसा उपचार करणार ..? हा प्रश्न आहे.

रूग्ण हा एकच आजार घेऊन रूग्णालयात येत नाही. आजाराची साखळी असते,एकातून एक अजार वाढतात. समजा एखादा रूग्ण एखाद्या रूग्णालायात गेलातर त्याच्यावर उपचारासाठी बाहेरचे डॉक्टर बोलावले जात नाहीत अथवा बाहेरचे डॉक्टर संबधित रूग्णालयात जात नाहीत. एकच डॉक्टर आपल्या कुवतीनुसार सर्व आजारावर उपचार करत असतो. जर उपचार योग्य झालातर ठीक पण योग्य उपचार झाले नाहीतर ..? त्यामुळे रूग्णावर विपरीत परिणाम होतो,जेंव्हा रूग्ण गंभीर होतो तेंव्हा त्या रूग्णाला मोठ्या शहराचा मार्ग दाखवला जातो. वेळेवर उपचार न झाल्यामुळे रूग्णाला जास्त काळ बाहेरगावच्या दवाखान्यात रहावे लागते किंवा प्राणाला मुकावे लागते. तालुक्यात कोठेही २४ तास सेवा उपलब्ध नाही. प्रत्येक दवाखान्यात तेच नेहमीचे डॉक्टर व त्यांचा स्टाफ असतो. जर त्या डॉक्टरांना महत्वाच्या कामासाठी बाहेर गावी जायची वेळ आलीतर नेहमीच्या रूग्णाचे हाल होतात. तो रूग्ण अन्य डॉक्टराकडे गेलातर तिथे पुन्हा बे पासून सुरवात होते. पुन्हा सर्व तपासण्या कराव्या लागतात वैगरे वैगरे... थोडक्यात काय तर पर्याय नसल्यामुळे रूग्णाला त्रास होतो. दुसरी गोष्ट म्हणजे नियमीत (फॅमीली) डॉक्टर दिवसभर काम करून थकतात, रात्री ते झोपल्यानंतर १२-१ वाजता रूग्ण दवाखान्यात गेला तर व डॉक्टरांना उठवले तर त्यांची रूग्ण पाहण्याची मानसीकता राहू शकते का..? डॉक्टरसुध्दा माणूस आहे, हे विसरून चालणार नाही. रात्री झोपेतून उठलेले डॉक्टर रूग्णाला स्वत:च्या मानसिकतेतूनच तपासणार. काहीजण लक्षपुर्वक तर काहीजण कसे-बसे तपासणार आणि वाटेला लावणार . त्याचा परिणाम रूग्णाच्या जीवावर होतो. अजुनही शहरात सर्व सुविधायुक्त रूग्णवाहिका नाही. गंभीर रूग्णाला बाहेर गावी पाठवायचेतर डॉक्टरसह सर्व सुविधा असणारी रूग्णवाहिका पाहिजे.या शहरात भुलतज्ञ नाही, अशा एकापेक्षा अनेक अडचणी आहेत. या अडचणी दूर करण्यासाठी येथे एक धर्मादाय तत्वावर मोठे रूग्णालय होणे गरजेचे आहे. तालुक्यातील अनेक सामाजिक कार्यकर्ते, राजकिय कार्यकर्तेयांच्यासमोर हे आव्हान आहे. अद्ययवत रूग्णालय नसल्याने तालुक्यातील शेकडो रूग्णांना प्राण गमवावे लागले आहेत. मागे एक बस चालकाला छातीत त्रास होऊ लागला, त्याने बस डेपोत लावली व एका खासगी रूग्णालयात गेला , तेथील डॉक्टरांनी त्याची स्थिती पाहून त्याला कुटीर रूग्णालयात जाण्याचा सल्ला दिला. तो चालक कुटीर रूग्णालयात गेला पण त्या दवाखान्याच्या पायऱ्या चढल्याबरोबर तो कोसळला तो उठलाच नाही.

असे अनेक प्रकार होतात पण हे संबधित गावात किंवा संबधित नातेवाईकांना समजते. इतरांना मात्र समजत नाही. त्यामुळे येथे अद्ययावत रूग्णालय उभारण्यासाठी मोठ्या प्रयत्नाची गरज आहे. लोकप्रतिनिधीनी ठरवले तर अशक्य नाही, समाजातील काही सधन मंडळीनी एकत्र येवून ठरवले तर त्यांनाही अशक्य नाही. अकलूज, नगर, सोलापूर, पुणे येथे पाच-पाच डॉक्टर एकत्र आले व त्यांनी अद्ययावत रूग्णालय उभारले आहे. तसा येथे प्रयोग करायला हरकत नाही. मध्यंतरी स्वामी विवेकानंद प्रतिष्ठान मार्फत एक प्रयत्न झाला, पण छोटी डिस्पेन्सरी सुरू करून उपयोग नाही. जोपर्यंत मोठे रूग्णालय होत नाही, तोपर्यंत अद्ययावत रूग्णवाहीका हा प्रयोग उपयुक्त ठरू शकतो आणि दुसरा पर्याय म्हणजे येथील काही डॉक्टरांनी एकत्रित येऊन एकाच छत्राखाली अद्ययावत यंत्रसामुग्रीसह रूग्णालय उभारले पाहिजे. या रूग्णालयाची २४ तास सेवा कार्यान्वीत झाली पाहिजे व एकाच छत्राखाली सर्व उपचार योग्यप्रकारे शिवाय कमी खर्चात झाले तर खुप मोठा ताण कमी होणार आहे व अनेक रूग्णांना पुर्नजन्म मिळणार आहे.

कुटीर रूग्णालयाच्या बाबतीतील अनुभव म्हणजे बाळंतपणाला गेलेली महिला किंवा थोडा गंभीर रूग्ण असेलतर किंवा हाड मोडले तरी सोलापूरला पाठवण्याची तजबीज केली जाते. मग अशा ठिकाणी रूग्ण किंवा त्यांचे नातेवाईक तिकडे कसे फिरकतील..? शासनाने शंभर कॉट एवढी मोठी सुविधा येथे देवूनही जर आपले लक्ष नसेल तर त्याचा उपयोग काय आहे. येथील अनेक पदे रिक्त आहेत. असो या सर्व बाबीचा विचार करता एकच गोष्ट महत्वाची आहे की तालुक्यातील आरोग्य हा विषय गंभीर आहे व सर्वचजण त्याकडे दुर्लक्ष करत आहेत,त्याचे परिणाम अनेकांना भोगावे लागले आहेत. संबधितांनी याकडे लक्ष दिले नाहीतर त्याचा फटका एकदिवस त्यांना सुध्दा बसेल पण त्यावेळी फार उशीर झालेला असेल. असे काही घडण्यापुर्वी समाजातील जाणत्या व्यक्तींनी विशेषत: लोकप्रतिनिधींनी व सामाजिक कार्यकर्त्यांनी सावध होण्याची गरज आहे.

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजुकराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# ॥ प्रथम पुण्यस्मरण ॥



कै.श्री.हरिभाऊ(दादा) पांडूरंग जगताप
(माजी नगराध्यक्ष, करमाळा नगरपरिषद)

सहवास जरी सुटला..,
स्मृती सुगंध देत राहील ।
आयुष्याच्या प्रत्येक वळणावर..,
'दादा' आठवण तुमची येत राहील ॥

स.न.वि.वि.आमचे येथे आमचे पिताश्री
**कै.हरिभाऊ(दादा) पांडूरंग जगताप (माजी नगराध्यक्ष)**
यांचे **प्रथम वर्षश्राध्द**
मित्ती भाद्रपद व॥ ८ शके १९४५ रोज शुक्रवार, दि.६/१०/२०२३ रोजी दुपारी १२ वा. ०५ मि. संपन्न होत आहे. तरी सर्वांनी या प्रसंगी पुष्पांजली वाहण्यास व महाप्रसाद घेण्यास उपस्थित रहावे; ही नम्र विनंती !

- टीप : ह.भ.प.निंबाळकर महाराज(रावगाव) यांचे सकाळी १० वा. किर्तन होईल.
- स्थळ : सुमन निवास, रंभापुरा गल्ली, करमाळा.

**आपले नम्र**
श्री.नितीन उर्फ बाळासाहेब हरिभाऊ जगताप, ॲड.शिवराज हरिभाऊ जगताप
गं.भा.सुमनताई हरिभाऊ जगताप
ॲड.लता अनिल पाटील, सौ.जयश्री दत्तात्रय शेरे, ॲड.मनिषा एकनाथ ढगे
डॉ.पल्लवी शरदकुमार पवार  समस्त जगताप परिवार, करमाळा.


शुध्द शाकाहारी

हॉटेल **चिवटे** फॅमिली रेस्टॉरंट



# ७वा वर्धापन दिन

कळविण्यास अत्यंत आनंद होत आहे की.. आपणा सर्वांच्या सदिच्छा व शुभेच्छाच्या पाठबळावर दि.२ ऑक्टोबर २०२३ रोजी यशस्वीरित्या **हॉटेल चिवटे** या व्यवसायाने ७ वर्ष पूर्ण केली आहेत.

उत्तम प्रकारचे खाद्य पदार्थ व तत्पर सेवेसाठी सदैव सज्ज

## हॉटेल चिवटे फॅमिली रेस्टॉरंट

सर्वांशी जिव्हाळ्याचं अतुट नात आणि आपल्या विश्वासाचं छत्र जोपासत आज आम्ही यशाच्या दिशेने वाटचाल करत आहोत. आपल्या सर्वांच्या सदीच्छा व आशिवार्दाने यापुढील प्रवासात गगनभरारी घेण्याचे बळ आमच्या पंखात येवो, हीच अपेक्षा. असेच प्रेम राहू द्या धन्यवाद !

**पत्ता : संगोबा रोड, श्रीदेवीचामाळ, ता.करमाळा.**

आपले नम्र : चिवटे परिवार, करमाळा.
मो.8888147005 / 9822502700

आपल्या सेवेसाठी नव्याने सुरू..
# कमलाई स्वीटस्

आमचेकडे राजस्थानी गुजराती व बंगाली मिठाई मिळेल !

पेढा काजुकतली बर्फी कलाकंद
चकली चिवडा, लाडू जामून जिलेबी
बेकरी उत्पादन
पाणीपुरी वडापाव पॅटीस
कोल्ड्रींक्स सर्व प्रकारचे थंड पेय
ड्रायफ्रुटस् बदाम व काजू तसेच म्हैसुरपाक

प्रोप्रा : देवासी बंधू
मो.8888980006
मो.9423141870

पार्टीसाठी समोसा, ढोकळा, जिलेबी, पॅटीस,वडापाव, पाणीपुरी ऑर्डरप्रमाणे तयार करून मिळेल..!

पत्ता **कमलाई स्वीटस्** एस.टी.स्टॅन्ड समोर, करमाळा.

न्यु. प्रविण सुपर मार्केट

- हुरड्यासाठी गुळभेंडी, सुरती बी मिळेल.
- नं.१ २१८९ गहू - ३५ रू. किलो
- बाजरी नं.१ - ३२ रू. किलो
- ज्वारी भारी - ६० रू. किलो

**आरोग्यासाठी गावरान कडधान्य भाव...**

- मटकी गावरान बारीक – १३० रू. किलो
- मटकी मोठी – ९० रू. किलो
- चवळी – ८० रू. किलो
- मसुर बेस्ट – ८० रू. किलो
- वटाणा – ९० रू. किलो
- बारीक गावरान मुग – १०० रू. किलो
- पाणीपुरी वटाणा – ८० रू. किलो
- काबोली हरभरा – १०० रू. किलो
- गावरान हरभरा – ६० रू. किलो

**ड्रायफ्रुट...**

- नं.१ बदाम –६५० रू. किलो
- काजु – १६० रू. पावकिलो
- अंजीर – २५० रू. पावकिलो
- पिस्ता – २५० रू. पावकिलो
- काळा मणुका – ९० रू. पावकिलो
- मणुका भारी – ६० रू. पावकिलो
- खजुर बॉक्स – १५० किलो
- पॅकींग खजुर – ७५ रू. अर्धा किलो
- भारी खजुर – १४० रू. किलो
- महावीर पापड – ११० रू. पॅकींग
- जोड गहू – ७० रू. किलो
- खोबरं – १३० रू. किलो
- गावरान धने – १०० रू. किलो
- पॉपकॉर्न मका – ३५ रू. पावकिलो
- पाणीपुरी – २५ रू. पावकिलो
- पाणीपुरी वटाणा – २० रू. पावकिलो
- गावरान बारीक मोहरी – ९० रू.किलो
- आरोग्यासाठी नाचणी – ७० रू. किलो

**सर्व किराणा माल होलसेल भावात मिळेल व घरपोच केला जाईल.**

संपर्क

ज्योती-क्रांती बँकेच्या शेजारी, दत्तपेठ, करमाळा

मो.9168052318

पान १ वरून पुढे...

# ग्रामपंचायत निवडणूक

शिंदे गटाने जोरदार तयारी केली आहे. माजी आमदार जयवंतराव जगताप गट व बागल गटाने भुमिका जाहीर केलेली नाही.

केम येथे मोहिते-पाटील समर्थक अजित तळेकर यांचे वर्चस्व राहिले आहे., या ठिकाणीही आमदार शिंदे गटाने जोरदार तयारी केलेली आहे. याबरोबरच चिखलठाण येथे आमदार शिंदे गटाचे चंद्रकांत सरडे यांची सत्ता आहे. येथे सरडे विरूध्द गावातील विरोधक एकत्र येऊन निवडणूक लढवितात. यावेळी नेमके चित्र कसे असेल हे पहावे लागणार आहे.

तालुक्यातील मोठ्या ग्रामपंचायतीच्या निवडणुका या टप्प्यात होणार असल्याने या सर्व गावात रंगतदार व चुरशीची निवडणूक होणार असल्याचे बोलले जात आहे. ज्या गावात ही निवडणूक होणार आहे, तेथे मात्र मतदारांची दिवाळीपूर्वीच दिवाळी साजरी होणार आहे. या निवडणुका प्रभारी तहसीलदार विजयकुमार जाधव यांचे अधिपत्याखाली होणार आहेत.

# मनोज गायकवाड यांचे निधन



करमाळा(सं.प्र.): येथील उद्योजक मनोज गायकवाड यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. त्यांचेवर ५ ऑक्टोबरला सकाळी भावपूर्ण वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. श्री गजानन स्पोर्टस् क्लबचे सदस्य शेखर(मोगली) गायकवाड यांचे ते वडील होत.

# पुणे काँग्रेसच्या जिल्हा उपाध्यक्ष पदी हाजी उस्मानशेठ तांबोळी



करमाळा(सं.प्र.) : पुणे काँग्रेसच्या जिल्हा उपाध्यक्ष पदी हाजी उस्मानशेठ तांबोळी यांची निवड करण्यात आली आहे. उस्मानशेठ तांबोळी हे यापूर्वीही पुणे जिल्हा उपाध्यक्ष पदावर कार्यरत होते. करमाळा व महाराष्ट्र मुस्लिम समाजाचे ते अध्यक्ष आहेत. त्यांचे सामाजिक काम मोठे असल्यामुळे तसेच राजकीय क्षेत्रातील मान्यवर त्यांना मानत असल्याने त्यांची पुन्हा पुणे काँग्रेसच्या जिल्हा उपाध्यक्ष निवड करण्यात आली. निवडीनंतर पुणे व करमाळा येथील पदाधिकाऱ्यांची त्यांचे अभिनंदन केले आहे.

महाराष्ट्रात प्रथमच...

गाडी,युपीएस इन्व्हर्टरसाठी नविन बॅटरी घेताय?
बॅटरी बदलण्यापूर्वी तुमच्या जुन्या बॅटरीची तपासणी करा

आणि बॅटरी बदलण्याच्या त्रासापासून चिंतामूक्त व्हा...
आता जून्या बॅटरी चालतील नव्यासारख्या !

२ चाकी | ३ चाकी | ४ चाकी | ट्रक | ट्रॅक्टर | JCB | पोक्लेन | सोलर

एकाच छताखाली सर्व प्रकारच्या सोलर इन्व्हर्टर बॅटरी सर्व्हिसेस

सुभद्रा पॉवर सोल्युशन्स

प्रोप्रा. श्री. स्वप्निल आदिनाथ आदलिंगे (ME Industrial Automation) 9172927337

श्री.आदिनाथ जयवंत आदलिंगे (मा.विस्तार अधिकारी, पंचायत समिती, करमाळा) 7588506719

शाखा नं.१ त्रिमुर्ती कुशन्स् शेजारी पुणे रोड,करमाळा / शाखा नं.२: मातोश्री कॉम्प्लेक्स, IDBI बँकेच्या पाठीमागे, श्रीदेवीचामाळ रोड, भवानी नाका, करमाळा.

डॉ.नायकुडे यांचे डोळ्यांचा दवाखाना

श्रीजय नेत्र रूग्णालय

डॉ.भाग्यश्री रामकृष्ण नायकुडे (नेत्रतज्ञ व शल्य चिकित्सक)
B.A.M.S.,M.S.(Shalakya-Netra) (Gold Medalist) Reg no.1-77199-A

करमाळा शहरामध्ये मोतीबिंदू (Cataract), डोळ्यांवरील पडदा(Pterygium) तिरळेपणा (Squint) यासारख्या डोळ्यांच्या सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया अत्याधुनिक मशिनद्वारे(फेको लेझर) व तज्ञ डॉक्टरांच्या मार्फत केल्या जातील.

वेळ : सोमवार ते शनिवार स.१०.३० ते सायं ७ (रविवार बंद) इमर्जन्सी सेवा उपलब्ध

श्रीजय ऑप्टिकल (सर्व प्रकारचे चष्मे तयार करून मिळतील.)

श्री कमलादेवी रोड, कृष्णाजीनगर, करमाळा. मो.९८३४०७१२१८, ९९२१०१३४९३

# करमाळा अर्बन बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न




करमाळा(सं.प्र.) : दि करमाळा अर्बन को.ऑप.बँक लि; करमाळा या बँकेची ७८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा प्रशासक दिलीप तिजोरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बँकेचे माजी चेअरमन कन्हैय्यालाल देवी, माजी उपाध्यक्ष फारूक जमादार, माजी नगरसेवक संजय सावंत, महादेव फंड, अमरजित साळुंके, पत्रकार नासीर कबीर, अशोक नरसाळे आदी सभासद उपस्थित होते. सभेचे वाचन बँकेचे माजी व्यवस्थापक विनायक चिवटे यांनी केले असून सर्व विषय एकमताने मंजूर करण्यात आले.

यावेळी बँकेचे सभासद फारूक जमादार यांनी करमाळा अर्बन बँकेच्या कर्मचाऱ्यांचा मेडिक्लेम करण्यात यावा; अशी सूचना केली. बाळासाहेब कर्वे यांनीही प्रश्न विचारले. प्रशासक दिलीप तिजोरे यांनी प्रशासक काळात उत्कृष्ट काम केल्याबद्दल सभासदांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. आभार व्यवस्थापक प्रकाश क्षीरसागर यांनी मानले. यावेळी बँकेचे कर्मचारी दिपक ओहोळ, अरूण माने, अमर करंडे, स्वाती फंड, साबीर तांबोळी, राजू साळी, वाहिद झारेकरी आदीजण उपस्थित होते.

# ज्योर्तिलिंग गणेश तरूण मंडळाच्या वतीने १५ हजाराची मदत

करमाळा(सं.प्र.) : कुंभेज येथील ज्योर्तिलिंग गणेश तरूण मंडळाच्या वतीने गावातील किशोर कुंभार यांच्या मुलीच्या शिक्षणासाठी १५ हजार रूपयांची मदत करण्यात आली. ती मुलगी सध्या बारामती येथे कॉम्प्युटर इंजिनिअरींगचा कोर्स करत आहे. मंडळाच्या सदस्यांनी अनावश्यक खर्च टाळून ही मदत केली आहे. मंडळाच्या वतीने अशाप्रकारचे अनेक उपक्रम राबविले जातात. सदर उपक्रमाचे कौतूक ग्रामस्थांकडून केले जात आहे. ही मदत मंडळाचे अध्यक्ष दशरथ मोरतळे यांचे हस्ते देण्यात आली. याप्रसंगी मंडळाचे उपाध्यक्ष गजानन तोरमल, सचिव गणेश शिंदे, मार्गदर्शक अमोल मुटके, संजय तोरमल, युवराज भोसले, बिटू तोरमल, दशरथ शिंदे, इन्नुस पठाण, नवनाथ तोरमल, गणेश पवळ, काका भोसले, पप्पु चौगुले, कुमार कादगे, नाना मोरतळे, अमीन पठाण, बापू पठाण, लालासाहेब तोरमल, चंद्रसेन काटे व इतर सदस्य उपस्थित होते.

श्री गजानन अगरबत्ती

- सुगंधी अगरबत्ती • कापूर
- अत्तर • धूप • भीमसेन कापूर,
- विविध कलरची रांगोळी
- सर्व प्रकारचे लोबन,
- सर्व प्रकारचे पुजेचे साहित्य योग्य दरात मिळेल !

पत्ता : वेताळपेठ, करमाळा., जि.सोलापूर

(प्रोप्रा : निखिल प्रदीप ढाळे, मो.8007255456)

लोकनेते स्व.दिगंबरराव बागल प्राथमिक शिक्षक पतसंस्थेचा

# वडशिवणे शाळेस आदर्श शाळा पुरस्कार प्रदान



करमाळा(सं.प्र.) : लोकनेते स्व.दिगंबरराव बागल प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेकडून दिला जाणारा करमाळा तालुका आदर्श शाळा पुरस्कार यावर्षी वडशिवणे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेस प्रदान करण्यात आला. या पतसंस्थेची १८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच संपन्न झाली. त्यावेळी पतसंस्थेचे अध्यक्ष सतीश कांबळे यांचे हस्ते या पुरस्काराचे वितरण करण्यात आले.

पुरस्कार मिळणे हेच काही सर्वस्व नसते. विद्यार्थी जेव्हा मोठे होतात ते एखाद्या मोठ्या पदावर आसनस्त होतात, चांगले पद भूषवितात. त्यापेक्षाही महत्वाचे ते आदर्श नागरीक बनतात. हीच खरी शिक्षकांसाठी पावती असते आणि या शिक्षकांच्या कार्यासाठी हाच खरा पुरस्कार असतो. त्याच पध्दतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वडशिवणे या शाळेमध्ये २०१८ पासून सारीका आंधळकर या मुख्याध्यापक पदाचा कारभार सांभाळत आहेत. सायन्स हॉल, परसबाग, वृक्षारोपण, शाळेचे सुशोभिकरण, गुणवत्ता आदी उपक्रम राबवून या शाळेने स्वच्छ शाळा, सुंदर शाळा यामध्ये तालुक्यामध्ये प्रथम क्रमांक पटकावला आहे. या कार्याची दखल घेऊन शाळेस आदर्श शाळा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

वडशिवणे शाळेस आदर्श शाळा पुरस्कार मिळाल्याबद्दल शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामपंचायत व शिक्षणप्रेमी ग्रामस्थांकडून शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षकांचे विशेष अभिनंदन करण्यात आले.

# यशवंतराव चव्हाण महाविद्यालय तर्फे शहरात स्वच्छता अभियान




करमाळा(सं.प्र.) : महात्मा गांधी जयंतीनिमित्त विद्या विकास मंडळ संचलित यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, ९ महाराष्ट्र बटालियन सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने करमाळा शहरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे, अध्यक्ष प्राचार्य मिलींद फंड, सहसचिव विक्रमसिंह सुर्यवंशी, प्राचार्य डॉ.एल.बी.पाटील, उपप्राचार्य कॅप्टन संभाजी किर्दाक यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार हे अभियान राबविण्यात आले. या अभियानांतर्गत एनसीसी कॅडेटकडून करमाळा शहरातून स्वच्छता रॅली काढून स्वच्छता हीच देशसेवा मानून एक तारीख एक तास स्वच्छता उपक्रम राबविण्यात आला. याप्रसंगी सीटीओ निलेश भुसारे, सर्व कॅडेट तसेच महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक व कर्मचारी वृंद उपस्थित होते.


खुशखबर मुळव्याधवर ट्रीटमेंटसाठी नको नगर-बारामती-सोलापूर खुशखबर
बार्शी येथील सुप्रसिध्द मुळव्याध तज्ञ
डॉ.विकास देविदास नागरगोजे (एम.एस.मुंबई)
धन्वंतरी मुळव्याध सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल
कोर्टा समोर, सुवर्ण मेडिकल शेजारी, परांडा चौक, बार्शी. मो.९७६७८९९५७१
उपलब्ध सुविधा...
● मुळव्याधवर इंजेक्शन
● डिलीव्हरीनंतर उद्‌भवारे कोंब
● एकदा ऑपरेशन करून पुन्हा उद्‌भवणारे कोंब
● संडासवाटे रक्त येणे, पु येणे
● संडासची जागा बाहेर पडणे
● संडास जागी खाज व आग होणे
● संडासाचा नागवेडा
● संडास नंतर बसण्यास त्रास होणे
● भगंदर, फिशर
● चार प्रकारचे मुळव्याध (४ प्रकारचे इंजेक्शन)
टीप..
१. प्रत्येक ओपीडी दिवशी १० रूग्णांची तपासणी करण्यात येईल.
२. येताना जुन्या आजाराची फाईल घेऊन येणे.
३. इंजेक्शनचा निर्णय डॉक्टरांचा राहील.
४. तपासणीपूर्वी नावनोंदणी आवश्यक
५. परगावच्या रूग्णांनी आदल्या दिवशी फोन करावा.
परिचय
डॉ.विकास देविदास नागरगोजे
मुळव्याध तज्ञ
पदवी : नाशिक
पदवोत्तर : मुंबई
● नांवनोंदणीसाठी संपर्क : मो.9405675887

# ऑनलाइन अर्ज करा.. ३० दिवसात रेशनकार्ड

## नावे कमी अथवा वाढविण्याचीही सोय; मोबाईल नंबर लिंक केल्यास दरमहा येईल मेसेज

करमाळा (सं.प्र.) : रेशनकार्डसाठी एजंटांकडे पैसे व कागदपत्रे दिली, पण महिन्यानंतरही शिधापत्रिका मिळालीच नाही; अशा तक्रारींना आता कायमचा पूर्णविराम लागणार आहे. अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने नागरीकांना ऑनलाइन रेशनकार्ड देण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे बनावटगिरीलाही चाप बसला आहे.

आपले सरकार सेवा केंद्र किंवा ऑनलाइन सुविधा केंद्रावर जाऊन अर्ज करताना त्यासाठी लागणारी सर्व कागदपत्रे जोडावीत. ५० ते १०० रुपयांच्या शुल्कात त्यासाठी अर्ज ऑनलाइन अपलोड केला जाईल. त्यानंतर अवघ्या ३० दिवसात संबंधित व्यक्तीला रेशनकार्ड मिळणार आहे. त्यामध्ये दुबार किंवा विभक्त रेशनकार्ड, त्यातील नावे कमी करणे किंवा नावे वाढविणे, नवीन रेशनकार्ड काढण्याचीही सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी किंवा अन्नधान्य वितरण अधिकाऱ्यांची डिजीटल स्वाक्षरी येईल. त्यानंतर त्या लाभार्थीला रेशनकार्ड मिळणार आहे. कोणत्याही एजंटांकडे जाऊन त्याला पैसे देण्याची गरज या सुविधेमुळे राहिलेली नाही. नागरीकांना आता शासकीय कार्यालयात हेलपाटे मारण्याची आवश्यकता नाही. घर-



### कार्डसाठी लागणारी कागदपत्रे..

आधारकार्ड व पॅनकार्डची झेरॉक्स, चालक परवाना किंवा मतदार ओळखपत्र, उत्पन्न दाखला व रेशनदुकानदाराचा दाखला, अर्जदाराचा रहिवासी दाखला, शेजारच्या रेशनकार्डधारकाचा जबाब, शंभर रूपयाच्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र

बसल्या त्यांना शिधापत्रिका मिळणार आहे.

### मोबाईलवर येईल मराठीतून मेसेज

प्रत्येक शिधापत्रिका धारकाचा आधार क्रमांक आता लिंक करण्यात आला आहे. अंतोदय योजनेतील कुटूंबाला दरमहा ३५ किलो तर प्राधान्य कुटूंबाला प्रतिव्यक्ती पाच किलो धान्य दिले जाते. केंद्र व राज्य सरकारने हे प्रमाण निश्चित केले आहे. दरम्यान कुटूंबातील कोणत्याही एका व्यक्तीने त्याचा मोबाईल क्रमांक शिधापत्रिकेला लिंक केल्यास धान्य घेतल्यानंतर त्या व्यक्तीला काही वेळातच त्या संबंधीचा मराठीतून मेसेज मोबाईलवर येणार आहे. त्यातून धान्य मिळाले नसल्याच्या तक्रारी कमी होतील; असा विश्वास विभागाला आहे.

### या संकेतस्थळावरून करा अर्ज

अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या निर्णयानुसार आता गावातील, शहरातील प्रत्येक नागरीकांना ऑनलाइन शिधापत्रिका मिळणार आहे. त्यासाठी त्यांना जवळील ऑनलाइन सुविदा केंद्र किंवा आपले सरकार सेवा केंद्रावर जाऊन या संकेतस्थळावर अर्ज करावा लागणार आहे. त्यासाठी आवश्यक कागदपत्रे अपलोड करावी लागणार आहेत.

सा.कमलाभवानी संदेश वार्षिक वर्गणी २०० रू.

पुनम एजन्सी
अंबुजा सिमेंटचे करमाळा तालुका वितरक
● बिल्डींग मटेरियल सप्लायर्स ● प्लंबींग ● हार्डवेअर
स्टील, सिमेंट, फरशी, ग्रेनाईट
होलसेल व रिटेल योग्य दरात मिळेल
Ambuja Cement
प्रोप्रा : प्रमोद शिंदे (9552946544) पत्ता: बायपास रोड, जेऊर.

# करमाळा तालुका प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था मर्या; करमाळा.

पंचवार्षिक निवडणूक २०२३-२०२८

# गुरूसेवा पॅनलचे अधिकृत उमेदवार

| क्र | | उमेदवाराचे नांव | चिन्ह |
|---|---|---|---|
| | | • सर्वसाधारण मतदार संघ • | |
| १ |  | बाबर विजय हनुमंत | विमान |
| ४ |  | दिरंगे धनंजय हरिभाऊ | विमान |
| ५ |  | जाधव राजेंद्र रूपचंद | विमान |
| ७ |  | जगताप तात्यासाहेब लक्ष्मण | विमान |
| ११ |  | पाटील उमेश बबनराव | विमान |
| १२ |  | सरडे हनुमंत उध्दव | विमान |

| क्र | | उमेदवाराचे नांव | आरक्षण |
|---|---|---|---|
| | | • महिला प्रतिनिधी मतदार संघ • | |
| १ |  | गुंड मंगल दादासाहेब | विमान |
| ४ |  | माळी सुनिता धोंडिबा | विमान |
| | | • अनुसुचित जाती-जमाती मतदार संघ • | |
| २ |  | काळे मुचकुंद रमेश | विमान |
| | | • इतर मागास प्रवर्ग मतदार संघ • | |
| २ |  | राऊत सुरेश रामदास | विमान |
| | | • भटक्या विमुक्त जाती-जमाती मतदार संघ • | |
| २ |  | सोनवणे अमृत कृष्णा | विमान |

प्रिय मतदार बंधू-भगिणींनो आपणांस नम्र विनंती...,
**विमान** या चिन्हावर रबरी फुलीचा शिक्का मारून
**गुरूसेवा पॅनल** च्या सर्व उमेदवारांना प्रचंड बहुमतांनी विजयी करा ही नम्र विनंती !

**साथ आपली प्रगती संस्थेची !**

**प्रकाशक :** **शाम माने** अध्यक्ष - ओम साई ग्रुप व सर्व सदस्य, शिवाजी कामटे, संजय वाघमारे, राजकुमार खाडे, गहिणीनाथ कुंभार, सतीश कांबळे, पोपट थोरात, दादा बोराटे, भागवत गर्जे, प्रकाश देवकर, बलभिम शिंदे, कांतीलाल म्हेत्रे, बापू गायकवाड, शिवाजी लोंढे, महेश होनकळसे, खलील खान, अर्जुन पिंपरे, सुरेश आटोळे, बापू गरड

**• मतदान : रविवार, दि.८/१०/२०२३ रोजी • वेळ : स. ८ ते सायं. ४ • स्थळ : म.गांधी विद्यालय, पुणे रोड, करमाळा .**

# विनोद गरड यांचेमुळे युवक हॅन्डबॉल खेळाकडे आकर्षित होतील : अतुल पाटील



करमाळा(सं.प्र.) : विनोद गरड यांनी क्रिडा क्षेत्रात करमाळा तालुक्याची मान उंचावली असून यामुळे अनेक युवक हॅन्डबॉल या खेळाकडे आकर्षित होतील; असे प्रतिपादन शिवछत्रपती पुरस्कार विजेते कुस्तीगीर व पंचायत समितीचे माजी सभापती अतुल पाटील यांनी केले.

जेऊर येथे आयोजित सत्कार समारंभात श्री.पाटील बोलत होते. जेऊर ग्रामपंचायत सदस्य तथा हॅन्डबॉल मधील राज्यस्तरीय नामांकित माजी खेळाडू विनोद गरड यांनी नुकतेच राज्यस्तरीय हॉन्डबॉल पंच परीक्षेत उत्तीर्ण होऊन यश संपादन केले व इथुन पुढील राज्य व देशपातळीवरील हॅन्डबॉल स्पर्धेमध्ये आता त्यांना पंच म्हणून नेमण्यात येणार असल्याने माजी आमदार नारायण पाटील कार्यालयाच्या वतीने व जेऊर ग्रामस्थांच्या वतीने विनोद गरड यांचा सत्कार करण्यात आला. पुढे बोलताना माजी सभापती अतुल पाटील म्हणाले, की कोणत्याही खेळात पंच हे न्यायदानाचे काम करत असतात. आज राज्यस्तरीय पंच म्हणून हे पवित्र काम करण्याची संधी विनोद गरड यांना मिळाली; याचा करमाळा तालुक्यास अभिमान आहे. विनोद गरड यांनी या क्षेत्रात आपल्या अचूक व नियमाला धरून दिलेल्या निर्णयावर असेच नांव उज्वल करावे. तसेच विनोद गरड यांची प्रेरणा घेऊन अनेक युवक आता या खेळाकडे वळतील; असा आशावाद व्यक्त केला.

यावेळी पाटील गटाचे युवा नेते पृथ्वीराज पाटील, भारत शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव प्रा.अर्जुनराव सरक, माजी सरपंच भास्कर कांडेकर, माजी उपसरपंच राजाभाऊ जगताप, धनंजय शिरस्कर, सोसायटी अध्यक्ष महेश कांडेकर, संतोष पिसे, उमाजी नाईक संघटनेचे तालुका अध्यक्ष पोपटराव वाघमोडे, स्वीय सहाय्यक सुर्यकांत पाटील, सुनील तळेकर, माजी उपसरपंच दत्तू नाना शिंदे, माजी सदस्य रामेश्वर तळेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

# दहिगाव योजनेचे पाणी नेरले तलावात सोडावे : औदुंबरराजे भोसले

करमाळा(सं.प्र.) : करमाळा तालुक्यातील साडे ओढ्यावर नेरले, सालसे रोडवर नेरले तलाव आहे. या तलावाच्या पाण्यावर वरकुटे, आळसुंदे, सालसे, नेरले या चार गावातील चाऱ्याचा व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अवलंबून आहे. तसेच घोटी येथून येणाऱ्या ओढ्यावर नेरले येथे तलाव आहे. नेरले, वरकुटे गावात काही छोटे बंधारे आहेत. दहिगाव योजनेचे पाणी घोटी व साडे येथील ओढ्यातून सोडल्यास हे सर्व बंधारे व दोन्ही तलावात पाणी येऊ शकते. त्यामुळे वरकुटे, आळसुंदे, सालसे, नेरले, आवाटी, लोणी(ता.माढा) या सहा गावातील पिण्याच्या पाण्याचा व चाऱ्याचा प्रश्न सुटणार आहे. तसेच या गावांमध्ये तलावाच्या पाण्यावर अनेक शेतकऱ्यांनी करोडो रूपये खर्च करून ऊस, केळी, फळबागाची लागवड केली आहे. पाऊस अत्यल्प असल्यामुळे दुष्काळी परिस्थितीत या पिकांना थोडाफार दिलासा मिळू शकतो. त्यामुळे दहिगाव योजनेचे पाणी नेरले तलावात सोडावे; अशी मागणी नेरलेचे माजी सरपंच औदुंबरराजे भोसले यांनी केली आहे.

प्रवेश ! महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे संचलित सरकारमान्य प्रवेश !!

अशोक कॉम्प्युटर टायपिंग इन्स्टिट्यूट

इंग्रजी : (३०-४०) मराठी : (३०-४०) हिंदी : (३०-४०)

टायपिंग क्लाससाठी प्रवेश देणे सुरू आहे

किल्ला विभाग, करमाळा. मो.८०८७९०५०८५

# भारतीय जनता पार्टी तर्फे करमाळा शहरात स्वच्छता अभियान



करमाळा(सं.प्र.) : देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवस व महात्मा गांधी जयंतीनिमित्त येथील भारतीय जनता पार्टीच्या वतीने करमाळा शहरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानांतर्गत शहरातील कै.नामदेवराव जगताप शॉपिंग कॉम्प्लेक्स, राशिन रोड येथे स्वच्छता मोहिम राबविण्यात आली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त देशभर आयोजित केलेल्या वेगवेगळ्या उपक्रमांमध्ये रक्तदान शिबीर, स्वच्छता अभियान, आरोग्य शिबीर असे कार्यक्रम संपन्न झाले. करमाळा शहरात भाजपाच्या वतीने स्वच्छता अभियान राबवून संपूर्ण शॉपिंग कॉम्प्लेक्स स्वच्छ करण्यात आला. यावेळी भाजपाचे जिल्हा सरचिटणीस किरण बोकन, संजय घोरपडे, जिल्हा उपाध्यक्ष शशिकांत पवार, जिल्हा चिटणीस शाम सिंधी, तालुका सरचिटणीस अमरजित साळुंखे, तालुका सरचिटणीस सुहास घोलप, शहराध्यक्ष जगदीश आगरवाल, संजय गांधी निराधार योजनेचे सदस्य नरेंद्रसिंह ठाकूर, भाजपा युवा मोर्चाचे प्रदेश सचिव दिपक चव्हाण, राजमाता जिजाऊ पतसंस्थेचे संचालक शिवनाथ घोलप, शहर उपाध्यक्ष कपिल मंडलिक, संतोष कांबळे, सोशल मिडीयाचे नितीन कांबळे, भैय्या दळवी यांचेसह भाजपाचे सर्व पदाधिकारी व व्यापारी वर्ग उपस्थित होते.

## जुनी पेन्शनच्या मागणीसाठी

# दिल्ली येथे शिक्षक लाखोंच्या संख्येने सहभागी - तात्यासाहेब जाधव




करमाळा(सं.प्र.) : १ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त कर्मचाऱ्यांना शासनाने जुनी पेन्शन बंद करून शेअर मार्केटवर अवलंबून असलेली नवीन पेन्शन योजना लागू केली आहे. त्यामुळे सर्व कर्मचाऱ्यांचे भविष्य अंध:कारमय झाले आहे. या विरोधात २००५ पासून देशातील विविध राज्यात विविध कर्मचारी संघटनेच्या माध्यमातून आंदोलन केले जात आहे. देशपातळीवर जुनी पेन्शन मिळावी व खाजगीकरण बंद करावे; या मागणीसाठी दिल्लीच्या रामलीला मैदानावर लाखोंच्या उपस्थितीत शंखनाद आंदोलन करण्यात आले. या आंदोलन करमाळा तालुक्यातून बहुसंख्य शिक्षक बांधव सहभागी झाले होते; अशी माहिती जुनी पेन्शन संघटनेचे जिल्हाध्यक्ष तात्यासाहेब जाधव यांनी दिली.

येणाऱ्या काळात जर जुनी पेन्शन योजना लागू केली नाहीतर सर्व कर्मचारी शासनाच्या विरोधात जाणार आहेत. त्यामुळे कर्मचाऱ्यांनी शासनाच्या भावनांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून जुनी पेन्शन योजना लागू करावी; अशी मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली. या आंदोलनात करमाळा तालुका जुनी पेन्शन संघटनेचे अध्यक्ष अरूण चौगुले, साईनाथ देवकर, सतीश चिंदे, विनोद वारे, अजित कणसे, बलभिम बनसोडे, प्रताप राऊत, अशोक दुधे, धनाजी शिंदे, महेश आरडे, पोपट पाटील, शरद झिंजाडे, सुनील वाकडे, विष्णू गीते आदी शिक्षक बांधव सहभागी झाले होते.

# डॉ.दिपक पाटील यांना एक्सलन्स आयुर्वेदचा राष्ट्रीय पुरस्कार प्रदान




करमाळा(सं.प्र.) : येथील गजानन आयुर्वेद मल्टीस्पेशालिटी स्पाइन ऑर्थो केअर सेंटरचे आयुर्वेद तज्ञ डॉ.दिपक सुर्यकांत पाटील यांना २०२३ चा एक्सलन्स आयुर्वेदचा राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला असून त्यांना दिल्ली येथे एका कार्यक्रमात प्रदान करण्यात आला आहे. या पुरस्काराबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

डॉ.दिपक पाटील यांना स्पाइन ऑर्थो-मर्म चिकित्सा याबद्दल ग्लोबल एक्सलन्स फोरम (एनएचआरओ, एनआयटीआय आयोग भारत सरकार सलग्न) तर्फे इंडियन आयकॉन २०२३ हा मानाचा पुरस्कार दिल्ली येथील लिला ॲम्बियन्स कन्व्हेशन हॉल येथे एका विशेष आयोजित कार्यक्रमात इंडियन आयकॉन ॲवार्डस् एक्सलन्स इन आयुर्वेद २०२३ हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी भारतीय निती आयोगाचे अधिकारी, प्रतिनिधी व जगभरातील विविध देशातील सदस्य उपस्थित होते. हा कार्यक्रम देशातील सर्वात मौल्यवान आणि प्रतिष्ठीत पुरस्कार सोहळ्या पैकी हा एक कार्यक्रम आहे. या पुरस्कार प्रसंगी उत्तर प्रदेश सरकारच्या कामगार व रोजगार मंत्रालयाचे अध्यक्ष डॉ.रघुराज सिंह, ग्लोबल इकॉनॉमिक फोरमचे डॉ.नईम तिरमिजी, डॉ.गौरव गुप्ता तसेच कार्यकारी व्यवस्थापन प्रमुख जितेंद्रकुमार तसेच राष्ट्रीय अध्यक्ष व कार्यकारी सचिव जीइएफ हे उपस्थित होते. या पुरस्काराबद्दल डॉ.पाटील यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# दहिगाव उपसासिंचन योजना सुरू - शेतकऱ्यांमध्ये आनंदोत्सव



करमाळा(सं.प्र.) : दहिगाव उपसासिंचन योजना सुरू झाली असून या पाण्याचे आवर्तन सुरू झाल्याने या पाण्याचे पूजन शेतकऱ्यांनी करून आनंद व्यक्त केला आहे. तालुक्याच्या पूर्व भागात पाऊस कमी असल्याने गेल्या अनेक महिन्यापासून ही योजना बंद होती. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांची पिके वाया गेली होती. शेतकऱ्यांच्या मागणीचा विचार करून आमदार संजयमामा शिंदे यांनी दहिगाव उपसासिंचन योजना सुरू करण्यासाठी प्रयत्न केले आहेत. हे पाणी प्रत्यक्षात कॅनॉलमधून शेतकऱ्यांच्या शेतात पोहोचले आहे. शेतकऱ्यांनी या पाण्याचे कॅनॉलवर जाऊन पाणीपुजन केले आहे. या पाणीपुजन प्रसंगी उद्योजक भरत आवताडे, माजी सरपंच दत्तात्रय आडसुळ, स्वीय सहाय्यक डॉ.विकास वीर यांचेसह शेतकऱ्यांनी पाणी पुजन केले आहे.

**सा.कमलाभवानी संदेश वार्षिक वर्गणी**
**१०० रु. भरून वर्षभर घरपोच अंक मिळवा..!**




मा.नगराध्यक्ष
माजी आमदार
आशिर्वाद
आशिर्वाद
स्व.प्रभाकर ढाळे
स्व.नारायण ढाळे
मा.नगराध्यक्ष
६ ऑक्टोबर
आमच्या क्लबचे संस्थापक/अध्यक्ष
व माजी नगराध्यक्ष
मा.श्री.
प्रशांत ढाळे
आपणांस वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
श्री गजानन सोशल ॲन्ड स्पोर्टस् क्लब
वेताळपेठ, करमाळा., जि.सोलापूर.


गजानन सोशल ॲन्ड स्पोर्टस् क्लबचे
संस्थापक/अध्यक्ष व माजी नगराध्यक्ष
मा.प्रशांत ढाळे
यांना वाढदिवसाच्या...
हार्दिक शुभेच्छा !
6 ऑक्टोबर
शुभेच्छुक
शारदा (प्रोप्रा : संतोष व्यंगलम)
कम्युनिकेशन ॲन्ड मोबाईल शॉपी
वोडाफोन, आयडिया
कंपनीचे अधिकृत डिलर
मोबाईल विक्री व दुरूस्ती
पत्ता
वेताळपेठ, करमाळा.
मो.9765242457
राजवी एजन्सीज्
काटदरे मसाले
सुरभी मसाले, कुकवेल मसालेचे
अधिकृत डिलर
(प्रोप्रा : चिन्मय मोरे)
वेताळपेठ, करमाळा. मो.९४२००९२९७७


नूतन संचालक
नूतन संचालक
करमाळा कृषी उत्पन्न
बाजार समितीच्या संचालक पदी आमचे नेते व माजी आमदार
मा.श्री.जयवंतराव जगताप
व भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष व युवा नेते
मा.श्री.शंभुराजे जगताप
यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन !
श्री.रामदास कुंभार सर
मा.सभापती, न.पा.शिक्षण मंडळ
सौ.सीमा कुंभार
शुभेच्छुक
डॉ.रोहन रामदास कुंभार
B.A.M.S. M.D.(Aru) D.G.O. स्त्रीरोग तज्ज्ञ
डॉ.मनोज रामदास कुंभार
M.D. कन्सलटींग फिजीशियन
ओजस हॉस्पिटल, करमाळा.
सुभाष चौक, डॉ.वीर यांचे दवाखान्यासमोर, मेनरोड, करमाळा.

# श्री आदिनाथ साखर कारखान्याची वार्षिक सभा संपन्न



करमाळा(सं.प्र.) : आदिनाथ सहकारी साखर कारखाना पूर्ण क्षमतेने यावर्षी चालवून ऊस उत्पादक कर्मचारी व ऊस वाहतुकदार यांना न्याय देणार असून, भ्रष्टाचाराला फाटा देऊन सर्वसामान्यांचे हित जपण्याचे काम करू; असा विश्वास प्रशासकीय अध्यक्ष बाळासाहेब बेंद्रे यांनी व्यक्त केला.

श्री आदिनाथ सहकारी साखर कारखान्याच्या ५१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत अध्यक्षस्थानावरूत श्री.बेंद्रे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्रशासकीय सदस्य महेश चिवटे, संजय गुटाळ, माजी कार्यकारी संचालक हरिदास डांगे, डॉ.वसंतराव पुंडे, प्रा.रामदास झोळ, सुहास गलांडे, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष राजेंद्र बारकुंड, माजी संचालक धुळा कोकरे, संतोष खाटमोडे, प्रा.शिवाजी बंडगर आदी मान्यवर उपस्थित होते. यावर्षी गाळपास येणाऱ्या ऊसाला काटा पेमेंट देणे व ऊस वाहतुकदारांना रोजच्या रोज वाहतूक भाडे देणे, कर्मचाऱ्यांच्या पगारी दर महिना करणे; यासाठी आपण कटीबध्द असल्याचे बाळासाहेब बेंद्रे यांनी सांगितले.

या सभेत साखर निर्यात अनुदान घोटाळा प्रकरणी तत्कालीन संचालक मंडळावर नुकसान भरपाई निश्चिती करावी; असा ठराव मंजूर करण्यात आला. तसेच कारखान्याची गाळप क्षमता ७५०० मे.टन करावी, ५ लाख लिटर डिस्लरी इथेनॉल प्रकल्प उभा करावा या ठरावाला मान्यता देण्यात आली. आदिनाथ कारखान्यात शिल्लक असलेली साडेपाच हजार पोती साखर जप्त केली आहे. यामध्ये आदिनाथचे नुकसान झाले असून या नुकसानीची जबाबदारी तत्कालीन संचालक मंडळ व कार्यकारी संचालकावर ठेवावी; अशा मागणीचा ठराव या सभेत मंजूर करण्यात आला. जानेवारी २०२३ मध्ये भंगार विक्रीतून आलेले ६५ लाख रू. रकमेचा हिशोब सभासदांपुढे मांडण्याचे सांगण्यात आले. कारण या काळात कारखाना बंद असताना हा पैसा गेला कुठे ? असा प्रश्न उपस्थित काही सभासदांनी केला. सभेच्या शेवटी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व आरोग्यमंत्री तानाजी सावंत, शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख प्रा.शिवाजीराव सावंत या तिघांच्या अभिनंदनाचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

# म.गांधी जयंतीनिमित्त जयप्रकाश बिले पब्लिक स्कूल तर्फे स्वच्छता अभियान



करमाळा(सं.प्र.) : श्री भैरवनाथ प्रतिष्ठान संचलित जयप्रकाश बिले पब्लीक स्कुल व बीसीए कॉलेज झरे यांचे संयुक्त विद्यमाने महात्मा गांधी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. म.गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन झाल्यानंतर स्वच्छ भारत अभियान उपक्रम शाळेमध्ये राबविण्यात आला. या अभियानांतर्गत शाळेतील व शाळेच्या भोवतालचा परिसर स्वच्छ करण्यात आला. यामध्ये शिक्षक, कर्मचाऱ्यांसह विद्यार्थी सहभागी झाले होते. यावेळी विद्यार्थ्यांनी म.गांधी यांचे विषयी विचार मांडले. तसेच गांधीजींच्या विचारांना उजाळा देणाऱ्या कलाकृत्या सादर केल्या. मुख्याध्यापक दादासाहेब खराडे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमास प्रमुख पाहूणे म्हणून आदिनाथ कारखान्याचे माजी कार्यकारी संचालक हरिदास डांगे उपस्थित होते. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष जयप्रकाश बिले यांनी कार्यक्रमाची संकल्पना मांडली व सर्व शिक्षकांना मार्गदर्शन केले. यावेळी संस्थेच्या खजिनदार आशाताई बिले, संचालिका स्वाती बिले, भीमराव घाडे, सरपंच भारत मोरे आदी मान्यवर उपस्थित होते. सुत्रसंचालन नफिसा घोडके यांनी केले तर उपस्थितांचे आभार सतीश कोंडलकर यांनी मानले.




नूतन पालकमंत्री
सोलापूर जिल्ह्याच्या पालकमंत्री पदी
मा.ना.चंद्रकांत(दादा) पाटील यांची निवड झाल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन व शुभेच्छा !
जिल्हाध्यक्ष
शुभेच्छुक
मा.ना.चंद्रकांतजी(दादा) पाटील
(मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्य)
श्री.चेतनसिंह(बाळासाहेब) केदार-सावंत
भारतीय जनता पार्टी सोलापूर(प.ग्रामीण)
श्री.शाम सिंधी
जिल्हा सचिव - भारतीय जनता पार्टी
सोलापूर (पश्चिम ग्रामीण)
श्री.नरेंद्रसिंह ठाकूर
माजी सदस्य-संजय गांधी निराधार
योजना, करमाळा.(९४२३३३३९७५)


उत्तम प्रशासक
अभ्यासू
कर्तव्यदक्ष
मार्गदर्शक
प्रश्नांची जाण
सृजनशील
संवेदनशील
समाजसेवक
उच्च शिक्षित नम्रता
स्पष्ट वक्ता
मा.श्री.
प्रशांतजी ढाळे
आपणांस जन्मदिनाच्या
०६ ऑक्टोबर
हार्दिक शुभेच्छा
संस्कृती प्रतिष्ठान, करमाळा.
• स्वस्तिक मेडिकल अँण्ड जनरल स्टोअर्स •
• शिवपार्वती स्विट होम • अजय प्रिंटर्स •

# निर्व्यसनी, निर्मळ मनाच्या माणसासोबत जन्माचे नाते जोडल्याने खूप समाधानी !



## नवरा माझा नवसाचा

मी अलका भीष्माचार्य चांदणे.. एक गृहिणी, एक आई आणि एक पत्नी म्हणून साऱ्या भुमिका पार पाडत असताना थोडे मागे वळून पाहते.

१९९२ साली माझे लग्न झाले, त्यावेळेस माझे वय १६ वर्षाचे होते आणि सरांचे वय २० वर्षाचे होते. खूप कमी वयात आमचे लग्न झाले. त्यांचे वडील शिक्षक होते आणि त्यामुळे त्यांना भविष्यात चांगली नोकरी मिळेल या विचाराने माझ्या आई-वडिलांनी या स्थळाला पसंती दिली.

आमचं लग्न झालं तेव्हा ते टी.वाय.बी.ए मध्ये शिकत होते. अभ्यासात हुशार होते. वायसीएम मध्ये हुशार विद्यार्थी म्हणून त्यांची ओळख होती. त्यामुळेच त्यांचे लग्न ठरले आहे या बातमीने प्राध्यापकासहीत सारे विद्यार्थी सुन्न झाले. काही प्राध्यापकांनी तर तू हे लग्न करू नकोस, असाही त्यांना सल्ला दिला. तू करिअरकडे लक्ष दे.. निघून जा.. असेही सांगितले. पण आई-वडिलांच्या आज्ञेत असलेले सर असं काही करू शकले नाहीत आणि दिवाळीतच आमचं लग्न झालं.

संसार, नवरा-बायको म्हणजे काय ? हे आम्हा दोघांनाही माहित नव्हते. हा माणूस सतत पुस्तकात रमलेला असायचा. सारखं वाचन चालू असायचं. त्यामुळे त्यांना कोणी डिस्टर्ब केलेले आवडायचे नाही. त्यामुळे त्या वयात कुठे जोडीनं फिरायला जायचं, एकत्र वेळ घालवायचं आमचं राहून गेलं. छोट्या-मोठ्या गोष्टींसाठी त्यांना वडिलांना पैसे मागावे लागायचे त्यामुळे मला काय घेऊन येतील अशी काही गोष्ट नसायची.

त्यानंतर ते एम.ए.साठी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे गेले. त्यामुळे नव्या नवरीचे जे काही दिवस असतात ते काही माझ्या वाट्याला आले नाहीत. तसं त्यांचं शिक्षणही महत्वाचं होतं. त्यामुळे मी सुध्दा त्यांच्या त्या वाटेत आडवी आले नाही. तसं तर त्यांच्या एकंदर रूबाबदार व्यक्तीमत्वामुळे कोणी एखादी मुलगी त्यांच्या प्रेमात पडेल याची भिती मला सतत वाटायची. पण त्यांचे वडील याबाबत कडक असल्याने असली कोणतीही गोष्ट घडली नाही. त्यांच्या त्या दोन वर्षाच्या काळात आमचा संसार थांबला होता. त्यांचं एम.ए. पूर्ण झाल्यावर ते बार्शीला बी.एड साठी गेले आणि पुन्हा प्रपंच सुरू झाला. त्याचं बी.एड सुरू असतानाच त्यांना करमाळ्यात नोकरी मिळाली आणि १९९६ साली मोठ्या मुलीचा जन्म झाला. त्यावेळेस त्यांचा पगार सहाशे चाळीस रूपये होता. दोन महिन्यांचा पगार जमवून त्यांनी मुलीसाठी पहिल्यांदा बाराशे रूपयाचा बजाज फॅन घेतला तो आजही आम्ही वापरतोय.

प्रत्येकाच्या जीवनात असतात त्याप्रमाणे आमच्याही जीवनात खूप चढउतार आले. भांडणं झाली.. विचारांचे टोकाचे मतभेद झाले.. तरी संसारचाा गाडा सुरूच राहिला. पहिल्या मुलीनंतर मुलगा आणि पुन्हा २००० साली मुलीचा जन्म झाला. आताच्या मुलींना एक मुल सांभाळताना नाकीनऊ येतात. मी ही तीन मुलं सांभाळली.. घर सांभाळले. गेल्यावर्षी सर खूप आजारी पडले. ते एक महिना दवाखान्यात होते. त्यातले १५ दिवस ते व्हेंटिलेटर वर होते. डॉक्टरांनी त्यांच्या जगण्याची आशा सोडली होती, पण मी सोडली नव्हती. ३० वर्षाचा सहवास, प्रपंच असा एका दमात कसा मोडणार होता ? लोकांच्या आशिर्वादाने ते त्यातून बरे झाले. पुन्हा पहिल्यासारखे रूबाबदार झाले, ही माझ्या जीवनातील मोठी गोष्ट होती. या ३० वर्षाच्या संसारात मी क्वचितच माहेरी गेली असेल. सकाळी गेले तर मी संध्याकाळी घरी परत येते. इथल्या माणसा इतकाच मला या घराचाही खूप लळश आहे. कधी ते बाहेरगावी गेले तर घरातील काहीतरी हरवलेय असे वाटत राहतं.. ते घरात असले की ते काहीबाही गोष्टीवरून आरडाओरडा करतात. त्यांना साऱ्या वस्तू जिथल्या तिथे हव्या असतात. पसारा आवडत नाही.. त्यामुळे ते आमच्यावर डाफरत असतात. कधी घरातील अस्ताव्यस्तपणा आवडला नाही तर झाडू पोछा घेऊन सारे घर स्वच्छ करीत राहतात... अंगण झाडतात.. झाडांना पाणी घालतात. हे करत असताना साडेनऊला डबा तयार झाला नाहीतर घर डोक्यावर घेतात. दहा वाजता डबा टेबलावर नसेलतर दोन मिनीट सुध्दा न थांबता विना डब्याचे घरातून बाहेर पडतात. त्यांना शिस्तीचे जीवन आवडते पण कधी त्याच्या अतिरेकाचा आम्हाला त्रास होतो. कंगव्यात अडकलेले केस दिसले की ते कंगवा खिडकीतून दूर फेकून देतात. फरशीवर केस दिसले की कुणाचे हे लांब केस म्हणून मुलीसकट मला दमबाजी करतात. त्यांना फिरण्याचे खूप वेड आहे. त्यांच्यासोबत आता खूप फिरून झाले आहे. ते छान ड्रायव्हींग करतात त्यामुळे आम्ही अधून मधून लाँग ड्राईव्हला जातो. आता मुलंही छान सेट झाली आहेत. मोठी मुलगी तिच्या संसारात मग्न आहे. तिचं छान आहे तर मुलगा इंजिनियर आहे. छोटी मुलगी करमाळा कोर्टात वकिली करते. त्यामुळे मी खूप समाधानी आहे.

माझी दागिण्यांची हौस त्यांना आवडत नाही. त्यामुळे माझ्या बोटातील अर्ध्या एक तोळ्याची अंगठी भांडी घासताना मी काढून ठेवल्याने हरवली तर त्याचा जास्त आनंद त्यांना झाला. एकदा तर म्हणाले, की चोराने दागिण्यांसाठी तुझा कान जर कापून नेला तर मी पेढे वाटीन. अशा या माणसासोबत वैचारीक मतभेद असूनही संसाराचा गाडा हाकीत इथपर्यंत आले. पण तरीही निर्व्यसनी निर्मळ मनाच्या या माणसासोबत माझे जन्माचे नाते जोडले आहे ही माझ्यासाठी खूप समाधानाची तेवढीच मोठी गोष्ट आहे.

# जेऊर येथे हजरत मोहम्मद पैगंबर जयंती उत्साहात साजरी

करमाळा(सं.प्र.) : इस्लाम धर्मावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येक जणांसाठी आजचा दिवस पवित्र आहे. ईद मिलाद उन नबी म्हणजेच भाईचारा इन्सानियत या विचारांची पाळेमुळे घट्ट करणारा दिवस आहे. मुस्लिम बांधव व सर्वांनाच या दिवसाबद्दल आदर आहे; असे प्रतिपादन माजी आमदार नारायण पाटील यांनी केले.

जेऊर येथे हजरत मोहम्मद पैगंबर जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. माजी आमदार नारायण पाटील यांनी उपस्थित राहून मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी माजी सभापती अतुल पाटील, सरपंच भारत साळवे, माजी सरपंच भास्कर कांडेकर, राजूशेठ गादीया, उपसरपंच धनंजय शिरस्कर, अंगद गोडसे, सदस्य नागेश झांजुर्णे, संदिप कोठारी, शांताराम सुतार, बापू घाडगे, योगेश कर्णवर, संतोष वाघमोडे, राजु लोंढे, राजू जगताप, हनुमंत विटकर, परमेश्वर



पाटील, नवीन दोशी, संपत राठोड, भारत महाविद्यालयाचे प्राचार्य अनंत शिंगाडे, भारत शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव प्रा.अर्जुनराव सरक, आनंद मोरे, सुयोग दोशी यांचेसह विविध संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. पुढे बोलताना श्री.पाटील म्हणाले, की आपण मुस्लिम बांधवांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी सतत प्रयत्न केले असून भविष्यातही या समाजाच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी आपण प्राधान्य देणार असल्याचे सांगितले.

सन २०१४ ते २०१९ या दरम्यान आवाटी येथील वलिबाबा शरीफ दर्गाह यास तीर्थक्षेत्र दर्जा मिळवून देऊन दोन कोटी रूपये विकास निधी मिळवून देण्यात माजी आमदार नारायण पाटील यांनी पुढाकार घेतला. असल्याचे पाटील गटाचे प्रवक्ते सुनील तळेकर यांनी सांगितले.

# साळुंखे यांचे कार्य प्रेरणादायी : श्री.जगताप

करमाळा(सं.प्र.) : संघर्षमय जीवनातून जिद्द, चिकाटी, परिश्रम याच्या जोरावर यशस्वी वाटचाल करणारे मुकुंद साळुंखे सर यांचे कार्य युवकांसाठी प्रेरणादायी आहे; असे मत जगताप गटाचे युवा नेते व बाजार समितीचे संचालक शंभुराजे जगताप यांनी व्यक्त केले.

मुकुंद साळुंखे यांनी चांदगुडे पेट्रोल पंपाजवळ करमाळा बायपास चौकामध्ये नव्याने सुरू केलेल्या फौजी स्नॅक्स सेंटरच्या उद्घाटन प्रसंगी श्री.जगताप बोलत होते. प्रमुख पाहूणे म्हणून यशकल्याणी सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष गणेश करे-पाटील, युवा सेनेचे जिल्हा समन्वयक निखिल चांदगुडे, पोपट थोरात, सामाजिक कार्यकर्ते महादेव फंड, माजी नगरसेवक अतुल फंड, प्रताप बरडे सर, मयुर साळुंखे, सौरभ साळुंखे, माजी सरपंच खंडू काळे, उत्तम हनपुडे, महादेव खरात, दत्तात्रय दळवी, संजय सोनवणे आदी उपस्थित होते.

# कुकडीचे पाणी वाटपात अन्याय झाल्यास तीव्र आंदोलन छेडू

## माजी आमदार नारायण पाटील यांचा इशारा



करमाळा(सं.प्र.) : कुकडीचे पाणी मांगी तलावासह पोंधवडी चारीतून इतर तलावात सोडा, पाणी वाटपात करमाळा तालुक्यावर अन्याय झाल्यास रस्त्यावर उतरून आंदोलन करू; असा इशारा माजी आमदार नारायण पाटील यांनी दिला आहे.

याबाबत अधिक बोलताना श्री.पाटील म्हणाले, की कुकडीचे ओव्हरफ्लो पावसाळी आवर्तन चालू असताना काही गोष्टी नियोजनात प्रामुख्याने घेतल्या पाहिजेत. एक तर एरव्ही कुकडीचे पाणी करमाळा तालुक्यास मिळत नाही. परंतु आता पावसाचे अतिरिक्त पाणी ओव्हरफ्लो होऊन मिळत आहे. यातून मांगी तलाव भरला गेला पाहिजे. मांगी तलावखालील पोथरे, करंजे, भालेवाडी, खांबेवाडी, धायखिंडी, मिरगव्हाण, अर्जुननगर, कामोणे, निलजसह काही अन्य गावे अवलंबून असतात. शेतीसह नागरीकांच्या पिण्याच्या पाण्याची योजना यावर चालते. यामुळे मांगी तलाव हा पाणी साठवण क्षमता असेल तेवढा भरून घेतला पाहिजे. पोंधवडी चारीतून कुकडीचे पाणी आसपासच्या भागात पोहचले पाहिजे. यामध्ये पोंधवडी, विहाळ, राजुरी, कोर्टी ओढा, सावडी, कुंभारगाव, देलवडी, अंजनडोह, वीट, मोरवड बंधारे,भोसे, रावगाव, वंजारवाडी बंधारे, पिंपळवाडी बंधारे, कुंभेज, जिंती, भिलारवाडी तलाव, झरे कालवा (पोंधवडी चारी व चिलवडी चारी) तसेच कर्जत ब्रँच कालवा- जातेगाव, कामोणे, पुनवर तसेच मांगी तलावात पिण्यासाठी पाणी पोहचले पाहिजे. कुकडी योजनेत करमाळा तालुका हा टेलकडील तालुका म्हणजेच शेवटच्या टोकावरील तालुका आहे. इतर वेळेस पाणी वाटपात व नियोजनात या तालुक्यावर अन्याय होतो. किमान आता पावसाळी पाणी वाटपात तरी टेल कडील या भागात जास्त दिवस पाणी दिले जावे. संबंधित योजनेतील तलाव, बंधारे, चाऱ्या भरून घ्याव्यात. करमाळा तालुक्यात पावसाचे प्रमाण कमी आहे. त्यामुळे चारा व पाणी टंचाई सदृश्य परिस्थिती तालुक्यात आहे. अशातच कुकडीचे पाणी मिळणे आवश्यक आहे.

या पाणी नियोजनात करमाळा तालुक्यावर अन्याय झाला तर शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आपण रस्त्यावर उतरून आंदोलन करणार आहे; असाही इशारा माजी आमदार नारायण पाटील यांनी दिला आहे.

# पैगंबर व महात्मा गांधी जयंतीनिमित्त उर्दू शाळेत खाऊचे वाटप

करमाळा(सं.प्र.) : करमाळा मुस्लिम समाजाच्या वतीने पैगंबर जयंती व महातमा गांधी जयंतीनिमित्त माजी नगरसेवक संजय सावंत, ओबीसी ऑर्गनायझनचे अध्यक्ष अमीर तांबोळी यांचे हस्ते कै.नामदेवराव जगताप उर्दू शाळेतील मुलांना शेरणी प्रसाद वाटप करण्यात आला. यावेळी शिवकुमार चिवटे, फारूक जमादार, मुस्लिम विकास परिषदेचे अध्यक्ष हाजी फारूक बेग, कादीरभाई शेख, अलिम खान, नागेश उबाळे, आनंद रोडे, राजू नालबंद, वाजीद शेख, समीर वस्ताद, हारूण वस्ताद, फैय्याज पठाण आदीजण उपस्थित होते

# भारत हायस्कुलचे माजी प्राचार्य सुरवसे सर यांचे निधन

करमाळा(सं.प्र.) :जेऊर येथील भारत हायस्कुलचे माजी प्राचार्य अभिमन्यु सुरवसे (वय-७०) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे दिपक व सचिन अशी दोन मुले, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. सुरवसे हे आबा या नावाने परिचित होते. त्यांचेवर सोलापूर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सर्व स्तरातील नागरीक उपस्थित होते.


## मेहेर नेत्र व दंत रुग्णालय [नियोजित]

शिंदे हॉस्पीटल जवळ, शाहूनगर, करमाळा

**पाहिजेत**

आमच्या हॉस्पीटलसाठी खालील कामगार भरती करायची आहे.

| क्र. | पदाचे नाव | संख्या | अनुभव |
|---|---|---|---|
| १ | रिसेप्शनिस्ट | १ | संगणक ज्ञान असलेली मुलगी |
| २ | सफाई कामगार | १ | |

तरी पात्र पुरूष व महिलांनी हॉस्पीटलच्या पत्त्यावर अथवा मोबाईल क्रमांकावर संपर्क करावा.

**• संपर्क : मो.9766579696**


# जेऊर रेल्वे स्टेशनवर प्रचंड गर्दीमुळे प्रवाशांचे हाल

## हुतात्मा, इंटरसिटी व उद्यान एक्सप्रेस रेल्वे गाड्यांना थांबा द्यावा : सुहास सुर्यवंशी



करमाळा(सं.प्र.) : जेऊर रेल्वे स्टेशनवर दिवसेंदिवस वाढत असणाऱ्या प्रचंड गर्दीमुळे प्रवाशांचे हाल होत आहेत. तेव्हा रेल्वे प्रशासनाने त्वरीत जेऊर रेल्वे स्टेशनवर हुतात्मा, इंटरसिटी व उद्यान एक्सप्रेस या दोन्ही रेल्वे गाड्यांना थांबा देण्याची मागणी जेऊर येथील रेल्वे प्रवाशी संघटनेचे अध्यक्ष सुहास सुर्यवंशी यांनी केली आहे.

याबाबत जादा माहिती देताना श्री.सुर्यवंशी म्हणाले, की दररोज हैद्राबाद - मुंबई एक्सप्रेस गाडीला व इंद्रायणी एक्सप्रेसला प्रवाशांची गाडी मध्ये चढण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागत आहे. गाडीमध्ये जागा भेटेन तर लाबंच, उभा राहून प्रवास करावा लागत आहे. त्यामुळे प्रवाशांचे जीवाचे हाल होत आहेत. मुंबई- हैद्राबाद एक्सप्रेसचे स्लीपर कोच कमी केले आहे. त्यामुळे दोन जनरल डब्यांवरती व दोन स्लीपर कोच वर प्रवाशांचा प्रचंड ताण येत आहे. प्रवासी वर्गातून हुतात्मा, इंटरसिटी व उद्यान एक्सप्रेस या गाड्यांना जेऊर स्टेशनवर थांबा देण्याची मागणी होत आहे. येणाऱ्या काही दिवसात दिवाळीचे सणासुदीचे दिवस आहेत. त्या काळात जेऊर स्टेशनवर नेहमीपेक्षा प्रचंड गर्दी असते. लवकरात लवकर हुतात्मा व उद्यान एक्सप्रेस या गाड्यांना जेऊर स्थानकावर थांबा देण्यात यावा. वारंवार आम्ही रेल्वे प्रशासनाकडे निवेदन देत आहोत, परंतू थांबा दिला जात नाही. भविष्यात जेऊर स्टेशनवर गर्दीमुळे प्रवाशांना गाडीत चढता न आल्याने एखादी दुर्घटना किंवा अनुचित प्रकार घडल्यास याला सर्वस्वी जबाबदार रेल्वे स्टेशन असेल; असेही श्री.सुर्यवंशी यांनी म्हटले आहे.

# साहेब.. आमचा परिसर स्वच्छ होईल का ?

करमाळा(सं.प्र.) : आमचा परिसर स्वच्छ होईल का.. अशी भावनिक साद जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चौधरवाडी, झरे येथील छोट्याशा गोंडस विद्यार्थ्यांनी ग्रामस्थांना केली आहे. पावसाचे दिवस संपत आले, परंतू शाळेची गळती काही थांबली नाही. शौचालय, शाळेभोवतालच्या परिसरात गवत खूप वाढले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना शौचालयला जाता येत नाही. मागील दिवसांपूर्वीच शाळेतील विद्यार्थी बाहेर खेळत असताना गवतामध्ये विद्यार्थ्यांना साप निदर्शनास आला. शाळेच्या पाठीमागे एक जुना पाण्याचा आड आहे. या कारणास्तव शाळेला वॉल कंपाऊंड असणे अत्यंत आवश्यक आहे. अशीच अस्वच्छता परिस्थिती अंगणवाडी शाळेची आहे. या विद्यार्थ्यांना उघड्यावरती शौचालयाला बसावे लागते. जल जीवन मिशनचे काम मंजूर आहे, परंतू उन्हा गेला पावसाळा आला आणि तोही उन्हाळ्याप्रमाणे चालला असे म्हणायला काय वावगं ठरणार नाही ! एकीकडे पाणी व स्वच्छतेला महत्व दिले जाते. त्याच पंक्तीत बसण्याचा आम्हा विद्यार्थ्यांना मान मिळेल अशी अपेक्षा, प्रतिक्षा करायला काही वावगं ठरणार नाही. अशाच काही भावना विद्यार्थ्यांच्या समजल्या. झरे गावातील ग्रामपंचायतीने नवीन प्रथा चालू केली असून पाच वर्ष पाच सरपंच त्यामुळे व्यथा मांडणं अवघड झालं आहे. आजी-माजी सरपंचाचे संपूर्ण दुर्लक्ष असून त्यांना चिमुरड्यांचे हाल दिसत नाहीत. या बाबीची दखल घेऊन झरे गावात स्वच्छता मोहिम राबवावी; अशी अपेक्षा विद्यार्थ्यांच्या पालकातून होत आहे.




# गणेशोत्सवात सर्वाधिक उपक्रम राबविणारे राशिनपेठ तरूण सेवा मंडळ



करमाळा(सं.प्र.): गणेशोत्सवानिमित्त विविध सामाजिक, धार्मिक उपक्रम, आरोग्य शिबीर,विविध स्पर्धांचे आयोजन तसेच गरजूंना मदत करून करमाळा शहरातील राशिनपेठ तरूण सेवा मंडळ हे तालुक्यात सर्वाधिक उपक्रम राबविणारे एकमेव गणशोत्सव मंडळ ठरले आहे.

राशिनपेठ तरूण सेवा मंडळाने सामाजिक बांधिलकी जपत हर्षपूर्ण वातावरणात यंदाचा गणेशोत्स साजरा केला. मंडळाने टाळ मृदुंगाच्या गजरात व हरिनामाच्या जयघोषात गणेशाची प्रतिष्ठापना केली होती. तसेच हस्ताक्षर, निबंध, चित्रकला, वक्तृत्व, वेशभुषा व गौरी गणपती आरास आदी विविध स्पर्धेचे आयोजन केले होते. या विविध स्पर्धेतील विजेत्यांचा कौतुक सोहळा, पुरस्कार व बक्षिस वितरण कार्यक्रमही मोठ्या उत्साहात संपन्न झाला. स्पर्धकांना प्रोत्साहनपर बक्षिसे देण्यासाठी अलंकार ज्वेलर्स, व्ही.एस.गुगळे किराणा स्टोअर्स, बनशंकरी मोबाईल शॉपी, न्यु श्री दत्त ज्वेलर्स, शिवपार्वती स्वीट होम, शिवालय जनरल स्टोअर्स, एक्सोजन फोटोग्राफी, कृष्णा मोबाईल शॉपी, चिवटे उपहारगृह आदींचे सहकार्य लाभले. लहान मुलांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी मंडळाच्या वतीने संगीत खुर्ची, स्लो सायकल, लिंबू चमचा आणि दोरीच्या उड्या इ. स्पर्धा घेण्यात आल्या.

राशिनपेठ तरूण सेवा मंडळ व शिवसेना वैद्यकिय मदत कक्ष यांचे संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य शिबीर घेण्यात आले. या शिबीरात ४७८ जणांची नेत्र तपासणी, ७१ जणांची ईसीजी तपासणी, ६८ जणांची शुगर तपासणी, ४५ जणांची मोतीबिंदू तपासणी, ५९ जणांची रक्तगट तपासणी, ३४ जणांची कॅन्सर तपासणी व ८२ जणांच्या इतर आरोग्य तपासणी मोफत करण्यात आली. रक्तदान शिबीरात ५६ रक्तदात्यांनी सहभाग नोंदवला. ५६३ जणांना चष्मे व ७२३ जणांना औषधे मोफत देण्यात आली. आरोग्य शिबीर यशस्वी करण्यासाठी वैद्यकिय मदत कक्षाचे मंगेश चिवटे व मंडळाचे सर्व सदस्य यांचे सहकार्य लाभले. शिबीराच्या उद्घाटन प्रसंगी करमाळा शहरातील सर्व डॉक्टरांची उपस्थिती होती. ठाणे येथील मेडिको टीम व श्री कमलाभवानी ब्लड बँक यांनी देखील या शिबीरात महत्वाची भुमिका पार पाडली.

मंडळाने यावर्षी भुतदया या संवेदनशील विषयावर संत एकनाथाच्या एका कथेवर आधारीत देखावा सादर केला होता. हा देखावा पाहण्यासाठी नागरीकांची रिघ लागली होती. तसेच बारा ज्योर्तिलिंगमधील एक सुप्रसिध्द आणि जगविख्यात अशा उज्ञैन महाकाल भगवान यांची छबी मंडळाने विसर्जन मिरवणुकीत दर्शविली होती. पारंपारिक गुलालाची उधळण करीत मंडळातील सर्व कार्यकर्त्यांनी गणपती बप्पाला निरोप दिला. गणेशोत्सव यशस्वीरित्या साजरा करण्याकामी मंडळाच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

# चिखलठाण-कुगाव रस्त्यासाठी आत्मदहनाचा इशारा



करमाळा(सं.प्र.) : चिखलठाण–कुगाव रस्त्याचे काम गेल्या अनेक महिन्यापासून रखडले असून ते काम तातडीने चालू करावे. अन्यथा १३ ऑक्टोबर रोजी आत्मदहन करण्यात येईल; असा इशारा चिखलठाण येथील अविनाश सरडे, योगेश सरडे व कुगाव येथील सचिन गावडे, शंकर बोंद्रे यांनी दिला आहे. याबाबत तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, की चिखलठाण–कुगाव रस्त्याचे काम चालू करणेबाबत व रस्ता चांगल्या दर्जाचा करण्यासाठी आम्ही २९ ऑगस्ट रोजी आमरण उपोषणाचा इशारा दिला होता. त्यावेळी सदर कामाबाबत वरीष्ठ अधिकाऱ्यांसमोर चर्चा करून रस्त्याचे काम इस्टीमेटप्रमाणे करण्याचे आश्वासन दिले होते व काम तातडीने चालू करण्याचेही सांगितले होते. त्यामुळे आम्ही उपोषण स्थगित केले होते. त्यानंतर मात्र सदरचे काम आठ दिवस चालू ठेवले व नंतर आत्तापर्यंत काम बंद ठेवले आहे. हे काम चालू करण्याबाबत आम्ही समक्ष व फोनद्वारे सांगितले. तरीही कामास प्रत्यक्ष सुरूवात केलेली नाही. त्यामुळे आम्ही नाविलाजास्तव १३ ऑक्टोबर रोजी आत्मदहन करणार आहोत. त्यानंतर होणाऱ्या परिणामास संबंधित अधिकारी जबाबदार राहतील; असाही इशारा दिला आहे.







# निंभोरे येथे भरदिवसा दोन लाखाची चोरी

करमाळा(सं.प्र.): निंभोरे येथे २९ सप्टेंबर रोजी दुपारी भरदिवसा घरात कुणी नसल्याचा फायदा घेत चोरट्यांनी घरात घुसून दोन लाखांचा ऐवज चोरून नेला आहे. या प्रकरणी अमित लक्ष्मण मारकड यांनी पोलीसात फिर्याद दिली. दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे, की मी निंभोरे येथील मारकड वस्तीवर रहायला असून २९ सप्टेंबर रोजी दुपारी दोनच्या सुमारास मी वडिलांना सोडविण्यासाठी जेऊर रेल्वेस्टेशनवर गेलो होतो. माझी आई घराचा दरवाजा लोटून घराच्या बाजूला जनावरांसाठी गन्नीगोल गवत काढत होती. दुपारी तीनच्या सुमारास घरातून दोन अनोळखी व्यक्ती घराबाहेर जाताना आईला दिसले. ती तातडीने घराकडे गेली असता, तिला घराचा दरवाजा उघडा दिसला. घरातील साहित्य अस्ताव्यस्त पडलेले दिसले. तसेच लाकडी कपाटामध्ये ठेवलेले साडेतीन तोळ्याचे सोन्याचे गंठन व दीड तोळ्याचे मिनी गंठन असे मिळून दोन लाखाचे दागिणे गायब होते. घरात शिरलेल्या या अज्ञात चोरट्यांनी १ लाख ४० हजार रूपये किंमतीचे साडेतीन तोळ्याचे सोन्याचे गंठन व ६० हजार रूपयांचे दीड तोळ्याचे मिनी गंठन असे मिळून दोन लाखाचे दागिणे या चोरट्यांनी चोरून नेले आहेत. या प्रकरणी अज्ञात चोरट्यांविरूध्द पोलीसात गुन्हा दाखल झाला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक साने हे करत आहेत

# दारू पिऊन टमटम चालविणाऱ्या विरूध्द गुन्हा दाखल

करमाळा(सं.प्र.) : दारू पिऊन टमटम चालविणाऱ्या विरूध्द पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे. हा प्रकार २ ऑक्टोबरला घडला आहे. यात पोलीस कॉन्स्टेबल दिपक नागनाथ कांबळे यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की २ ऑक्टोबरला आम्ही सकाळी बायपासवर बेकायदेशीर वाहनांवर कारवाई करत असताना पोथरे येथील लक्ष्मण रावसाहेब झिंजाडे हा सायंकाळी पावणेसात वाजता त्याच्या मालकीचा टमटम एमएच ४२ बीएफ ०१३५ हा दारू पिऊन चालवत असल्याचे लक्षात आले. त्यानंतर आम्ही त्याची गाडी थांबवली तेव्हा त्याच्या तोंडाचा वास आला. त्यानंतर त्याची बिथ ॲनीलायझर मशिनद्वारे तपासणी केली असता, तो दारू पिल्याचे स्पष्ट झाले आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रविण साने हे करत आहेत.

# गांधी जयंतीनिमित्त पोलीसांची दारू विक्रेत्यावर धडक मोहिम

करमाळा(सं.प्र.) : महात्मा गांधी जयंतीनिमित्त पोलीसांनी तालुक्यातील दारू विक्रेत्याविरूध्द धडक मोहिम उभारून सहा जणाविरूध्द कारवाई केली आहे.

वाघाचीवाडी, ता.करमाळा येथे दादा बबन वाघ हा सात मित्रांची हॉटेलच्या पाठीमागे पत्राशेडच्या आडोशाला बसून देशीदारू विक्री करत असल्याचे आढळून आले. त्याच्याकडे ८४० रूपयाच्या १२ दारूच्या बाटल्या आढळल्या आहेत. वांगी नं.३ येथे भामा महादेव जाधव ही महिला २ ऑक्टोबरला दुपारी साडेतीन वाजता हातभट्टी दारू विक्री करत असताना आढळून आली आहे. तिच्याकडे ८०० रूपये किंमतीची दहा लिटर हातभट्टी दारू सापडली आहे. हिवरवाडी रोडवरील यशराज हॉटेल शेजारी लक्ष्मण भागवत भांडवलकर रा.वडगाव दक्षिण हाही सायंकाळी ६ वा. १० मि. हातभट्टी दारू विक्री करताना आढळून आला आहे. त्याच्याकडे ७०० रूपयाची १० लिटर हातभट्टी दारू सापडली आहे. सोगाव पश्चिम येथे कौशल्या बजरंग शिंदे ही सायंकाळी पाच वाजता घराच्या पाठीमागे पत्र्याच्या आडोशाला बसून हातभट्टी दारू विक्री करताना आढळून आली आहे. तिच्याकडे ११०० रूपयाची १० लिटर हातभट्टी दारू सापडली आहे. रावगाव येथे हातभट्टी दारू विक्री करताना २ वा. ४० मि. सुरेश लक्ष्मण पवार रा.कान्होळा वस्ती, रावगाव हा सापडला असून त्याच्याकडे १ हजार रूपयाची १० लिटर हातभट्टी दारू सापडली आहे.झरे येथे महावीर कैलास मोरे हा हातभट्टी दारू विक्री करताना आढळून आला असून त्याच्याकडे १०५० रूपयाची १५ लिटर हातभट्टी दारू सायंकाळी ५ वा. १० मि. सापडली आहे. या प्रकरणी पोलीसांनी सहा जणाविरूध्द कायदेशीर कारवाई केली आहे.

# जखमी अवस्थेत आढळलेल्या अनोळखी व्यक्तीचे उपचारा दरम्यान निधन

करमाळा(सं.प्र.) : करमाळा–टेंभूर्णी रोडवरील शेलगाव(वांगी) येथे एक अनोळखी व्यक्ती जखमी अवस्थेत आढळून आला होता. उपचारा दरम्यान तो व्यक्ती मयत झाला असल्याची माहिती करमाळा पोलीसांनी दिली. याविषयी अधिक माहिती अशी, की २९ सप्टेंबर रोजी करमाळा–टेंभूर्णी रोडवर शेलगाव (वांगी) येथे अंदाजे ४० ते ५० वर्षे वयाची व्यक्ती स्थानिकांना जखमी अवस्थेत आढळून आला होता. पोलीसांना माहिती मिळाल्यावर सदर व्यक्तीला जवळील रूग्णालयात दाखल केले. परंतु उपचारा दरम्यान त्या व्यक्तीचे निधन झाले. पोलीसांनी केलेल्या तपासात या मयत व्यक्तीचे नाव बिरामन गुप्ता (वय– अंदाजे ४० ते ५० वर्षे) रा.कन्हौली, खास देवारिया, उत्तरप्रदेश. अंगात निळ्या रंगाचा शर्ट, त्यावर पांढरे रंगाचे रेषा, वर्ण गोरा, बांधा सडपातळ, निळ्या रंगाची पॅन्ट वर्णन आहे.

पुण्यातील सुप्रसिद्ध विश्वराज हॉस्पिटल येथील नामवंत,
सुपर स्पेशालिटी तज्ञ डॉक्टर्स आता आपल्या करमाळा येथे २०२३ पासून उपलब्ध

माईर्स विश्वराज – हॉस्पिटल –
NABH CERTIFIED

पूर्व हवेलीतील एकमेव 65 बेड्चे
अद्यावत व अत्याधुनिक अतिदक्षता विभाग

| डॉ. दर्शन गौड | डॉ. रामप्रसाद धरणगुत्ती | डॉ. महेश रोकडे | डॉ. संजय धनगर | डॉ. प्रमोद कुमार | डॉ. अनिकेत झरकर |
|---|---|---|---|---|---|
| MBBS , MS , Mch | MBBS, D'ORTHO | MBBS, MD | MBBS, DNB, DNB | MBBS, MS Ortho | MBBS, DNB |
| मेंदू व मणका शस्त्रक्रिया तज्ञ | गुडघे व सांधे प्रत्यारोपण, बाल अस्थिरोग शस्त्रक्रिया तज्ञ | किडनी विकार तज्ञ | मूत्रविज्ञान, दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया तज्ञ | स्पाईन, रिप्लेसमेंट, ऑर्थो सर्जन | जनरल सर्जरी, दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया तज्ञ |
| महिन्याचा पहिला शुक्रवार स. 11 - दु. 2 पर्यंत | महिन्याचा दुसरा शुक्रवार स. 11 - दु. 2 पर्यंत | महिन्याचा तिसरा शुक्रवार स. 11 - दु. 2 पर्यंत | महिन्याचा तिसरा शुक्रवार स. 11 - दु. 2 पर्यंत | महिन्याचा चौथा शुक्रवार स. 11 - दु. 2 पर्यंत | महिन्याचा चौथा शुक्रवार स. 11 - दु. 2 पर्यंत |

तपासणी फी फक्त रु. 500/-

पवार जनरल हॉस्पिटल - 99502 57373
"इंद्रप्रस्थ" एस.टी. स्टॅन्डसमोर, करमाळा, जि. सोलापूर.

विश्वराज हॉस्पिटल - 020 6760 6060
पुणे-सोलापूर रोड, लोणी काळभोर, पुणे

अत्याधुनिक सोयीसुविधेसह आपल्या सेवेत नव्याने दाखल...

# विकी मंगल कार्यालय

एस.टी.स्टॅन्ड समोर, बँक ऑफ इंडिया शेजारी, करमाळा., जि.सोलापूर

संपर्क : मराठा मंदिर इव्हेन्ट मॅनेजमेंट-८८५५८८५५७८

सुविधा..

- भव्य स्टेज 32 x 25 फुट
- जनरेटर 20kv सुविधा
- वधु-वर कक्ष रूम उपलब्ध
- प्रमुख पाहूण्यांसाठी रूमची सुविधा
- बुफे जेवण सेट उपलब्ध
- स्वतंत्र शाकाहारी किचन व्यवस्था
- पुरूष/महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह
- छोट्या कार्यक्रमासाठी ३० X १०० चे २ हॉल उपलब्ध
- जेवणासाठी टेबल, खुर्च्या व्यवस्था
- एकाच पंगतीमध्ये ५०० लोकांची जेवणाची व्यवस्था

## मराठा मंदिर इव्हेन्ट मॅनेजमेंट पॅकेज

### लग्नसमारंभ पॅकेज

- जेवण सेटअप (२०००, १५००, १००० व ५०० लोकांसाठी), बुफे जेवणाचा सेटअप किंवा टेबलखुर्ची दोन्ही सेटअप उपलब्ध
- वधू व वराचे हार-२, गुच्छ-२, गजरे-१०० नग
- प्रमुख पाहूण्यांचे स्वागत व सुत्रसंचालक
- प्रमुख पाहूण्यांसाठी १०० फेटे
- घोडा(वरातीसाठी)
- पिण्यासाठी फिल्टरचे पाणी





- डेकोरोशन(स्टेज, मेहंदी/हळदी/संगीत)
- बॅन्ड/डिजे/बॅन्जो(हळदी/लग्नसमारंभ)
- पंडितजीसह पुजेचे सर्व साहित्य
- फोटोग्राफर
- अक्षदा पाकीट
- मेहंदी, रांगोळी(हॉल समोर)



लग्न तुमचे..., नियोजन मराठा मंदिरचे !



### वाढदिवस समारंभ पॅकेज

केक, फटाके/पायरो, हार व फुलं, प्रशस्त स्टेज व हॉल(मिनी)30 x 100 फोटोग्राफी, डेकोरेशन, जेवण-२००, ३०० व ५०० लोकांचे. रांगोळी, मेकअप रूम/चेजींग रूम व्यवस्था,




### नामकरण समारंभ पॅकेज

डेकोरेशन, फोटोग्राफी हार-फुलं, पाळणा, फटाके/पायरो प्रशस्त स्टेज व स्वतंत्र हॉल(मिनी)30 x 100 जेवण-२००, ३०० व ५०० लोकांचे, रांगोळी, मेकअप रूम/चेजींग रूम व्यवस्था,



### डोहाळे जेवण पॅकेज

हार-फुलं, डेकोरेशन फोटोग्राफर, साज, झोपाळा प्रशस्त स्टेज व स्वतंत्र हॉल(मिनी)30 x 100 जेवण-२००, ३०० व ५०० लोकांचे, रांगोळी, मेकअप रूम/चेजींग रूम व्यवस्था,



सर्व शुभकार्यासाठी 'मराठा मंदिर इव्हेन्ट मॅनेजमेंट' सज्ज आहे !

संपर्क : मो.नं.8855885578, 9763258855

## करमाळा तालुका आरोग्य अधिकारी पदी डॉ.रविंद्र पुंडे यांची निवड

करमाळा(सं.प्र.) : करमाळा तालुका आरोग्य अधिकारी पदी डॉ.रविंद्र पुंडे यांची निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल डॉ.सादिक बागवान, डॉ.यशवंत व्हरे, डॉ.रविकिरण पवार, डॉ.लावंड, डॉ.समीर बागवान यांनी डॉ.पुंडे यांचा सत्कार केला आहे. करमाळा तालुक्यातील आरोग्यसेवा सक्षम करण्यासाठी प्रयत्न केला जाईल तसेच सर्वसामान्य रूग्णांना करमाळा तालुक्यातील सर्व डॉक्टरांनी चांगल्याप्रकारे सेवा द्यावी. काही अडचणी असतील तर समन्वय ठेवून त्याची सोडवणूक केली जाईल; असे मत डॉ.रविंद्र पुंडे यांनी यावेळी व्यक्त केले.



## बी.के.मॉल भाड्याने देणे आहे

करमाळा-नगर बायपास रोडवरील बी.के.मॉल भाड्याने देणे आहे



संपर्क : ९९२२६४७६६२/८३०८२५११११